


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७६९. वा | रविवार | दि. १२ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# संजय राऊतांची भर पावसात तुफानी बॅटिंग, मोदींचा एकेरी उल्लेख,म्हणाले-देश संकटात...

**वृत्तसंस्था/ नाशिक**

महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारार्थ ठाकरे सेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी नाशिकमधील चौक मंडई या ठिकाणी सहभाग घेतली. या सभेच्या दरम्यान खासदार संजय राऊत हे भाषणाला उभे राहिले आणि जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. भर पावसात संजय राऊत यांनी आपले भाषण सुरू ठेवले होते. खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्लाबोल केला. देश संकटात आहे संविधान संकटात आहे त्यामुळे सर्वांनी ही तानाशाही संपवण्यासाठी पुढाकार घेऊन लढायला पाहिजे, अशी असे म्हणत मोदींवर टीका केली. हिंदू-मुस्लिम वाद लावून समाजा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न मोदींकडून सुरू असल्याचा देखील खासदार संजय राऊत यांनी म्हटले. मात्र, या सभेच्या दरम्यान जोरदार पाऊस सुरू झाला होता आणि या पावसात देखील खासदार संजय राऊत यांनी आपली भाषण सुरू ठेवल्याचे पाहायला मिळाल.ठाकरे सेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी नाशिकमध्ये दोन सभा घेतल्या. पहिली सभा ही सातपूर येथील कामगार वस्तीत घेतली तर दुसरी सभा जुने नाशिक परिसरातील चौक मंडी या ठिकाणी असलेल्या मुस्लिम बहुल भागात घेतली. या दोन्ही सभेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर एकेरी भाषेत संजय राऊत यांनी हल्लाबोल केल्याचा पाहिला मिळाला. मुस्लिमांना त्यांचे हक्क मिळवून देऊ. महाविकास आघाडी सरकार आल्यास काँग्रेस हिंदूंची संपत्ती मुस्लिमांना देईल असे बोलत उपस्थित बांधवांना संजय राऊत यांनी साद घातल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे आता नरेंद्र मोदींवर संजय राऊत यांनी केलेल्या गंभीर आरोपांवर भाजप नेमकी काय भूमिका घेणाऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संजय राऊत यांची चौक मंडई परिसरात सुरू असलेल्या सभेत पाऊस आल्याने पावसात संजय राऊत यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर गंभीर टीका करत पावसात भाषण केले. मात्र त्यानंतर अवघ्या वीस मिनिटात संजय राऊत यांनी आपले भाषण आवरतं घेतल्याचे पाहायला मिळाल. पावसाच्या दरम्यान उपस्थित मात्र पळापळ करत असताना बसून रहा असे देखील आवाहन संजय राऊत यांनी केले. मुसळधार पाऊस सुरू असताना देखील संजय राऊत यांनी सभेत भाषण केले. त्यामुळे नाशिकच्या पावसातील सभेमुळे आता महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांना या सभेचा नेमका किती फायदा होतो हे बघणं देखील तितकाच महत्त्वाचा असणार आहे.



# भेंडवळच्या घट मांडणीचे भाकीत जाहीर

## राजा कायम तर अशी असणार या वर्षीची भेंडवळची भविष्यवाणी

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध भेंडवळच्या घट मांडणीचे भाकीत जाहीर झाले आहे घट मांडणी पद्धत म्हणजे शेतात खड्डा खड्ड्यात मातीचा घट घाटात पाणी आणि त्यावर कुरडया त्याच्या बाजूला पान सुपारी आणि विविध १८ प्रकारची धान्य अशी या घट मांडणीतून वर्षभराचा हंगाम पीक पाऊस अर्थव्यवस्था संरक्षण व्यवस्था आणि राजकीय घडामोडीचा अंदाज वर्तवला जातो बुलढाणा जिल्ह्यातील भेंडवळ परिसरातील शेतकरी दावा करतात की ३५० वर्षापासून अक्षय तृतीयेला ही प्रथा जोपासली जाते या प्रथेला शेतकऱ्यांची मोठी मान्यता असते या मांडणीतून जाहीर केलेल्या अंदाजाबद्दल शेतकऱ्यांमध्ये मोठी उत्सुकता असते राज्यातील शेतकऱ्यांचा या प्रथेवर मोठा विश्वास असतो तर सकाळी सूर्योदयाच्या वेळी चंद्रभान महाराजांचे वंशज पुंजाजी महाराज आणि सारंगधर महाराज यांनी या घटमांडणीचे निरीक्षण करून यंदाची भेंडवळची



भविष्यवाणी जाहीर केली आहे. याकडे संपूर्ण राज्याची लक्ष लागून असते यामध्ये शेतकऱ्यांसाठी भविष्यवाणी अशी की यंदा पावसाच्या परिस्थितीमध्ये पाऊस पहिल्या महिन्यामध्ये कमी असणार आहे दुसऱ्या महिन्यामध्ये साधारण तर तिसऱ्या महिन्यामध्ये प्रचंड पाऊस असणार आहे चौथ्या महिन्यांमध्ये चांगला पाऊस असणार आहे. अतिवृष्टीचे भाकीत वर्तवण्यात आले आहे चौथ्या महिन्यामध्ये अवकाळीचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे पिकाबाबत केलेल्या भाकितामध्ये गहू जवारी तांदूळ आणि इतर पिके सर्वसाधारण मोघम स्वरूपाची पीक सांगण्यात आली आहे मात्र उत्पन्न चांगले असले तरी अवकाळीने या पिकांना फटका बसणार आहे असे भाकीत यंदाच्या भविष्यवाणीमध्ये वर्तवण्यात आले आहे यामध्ये राजकीय भविष्यवाणी अशी की राजकीय परिस्थितीवरही यंदा राज्यात निवडणुका चालू असल्यामुळे राजकीय भाकीत चांगल्या गेले नाही मात्र पानवेळा कायम आहे म्हणजेच पंतप्रधान कायम राहील असे म्हटल्या जाते भेंडवळच्या गट मांडणीचे भाकीत दरवर्षी जाहीर केले जातात

# खोटी बतावणी करून महिलेची पोथ केली लंपास



**जनसंचलन/ खामगाव**

खोटी बतावणी करून महिलेला तिच्या गळ्यातील सोन्याची पोष थैलीत ठेवायला लावून हात चलाखीने एका भामट्याने सदर पोथ लंपास केल्याची घटना स्थानिक केडीया टर्निंग भागातील अर्जुन जलमंदिर जवळ पडली. येथील चांदमारी भागातील सौ. उर्मिला यशवंत बोडखे (५०) या गुरुवार ९ मे रोजी अर्जुन जलमंदिर जवळून जात असतांना एका अनोळखी इसमाने त्यांना थांबवले व बँकेचे उद्घाटन आहे. पाच हजार रूपये अनुदान वाटप सुरू आहे. तुमच्या कानातील व गळ्यातील सोन्याच्या वस्तू पाहून तुम्हाला अनुदान देणार नाहीत, म्हणून तुम्ही सोन्याच्या वस्तू काढून ठेवा असे म्हटले, त्याच्या सांगण्या प्रमाणे सी. बोडखे यांनी त्यांच्या गळ्यातील ३१ हजार किंमतीची सोन्याची रुमालात बांधून बाजाराच्या थैलीत ठेवली. दरम्यान सदर भामट्याने हात चलाखीने सी. बोडखे यांच्या हातातील थैलीमधील सोन्याची पोथ अलगदपणे लंपास केली. काही वेळानंतर ही घटना त्यांच्या लक्षात आली. आपली फसवणूक झाल्याचे समजल्यानंतर सौ. उर्मिला बोडखे यांनी याबाबत शहर पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून पोलिसांनी याप्रकरणी अज्ञाताविरुद्ध कलम ४२० भादंवी नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# खडकपूर्णा नदीतून झालेल्या राक्षसी रेती उत्खननाचा मेळ लागेना...

## तांत्रिक मोजमापाचे पत्रही पडले धूळखात...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील खडकपूर्णा नदीतून रेती उत्खननाच्या इ. निविदा मधील अटी व शर्तीपेक्षा जास्त रेती उत्खनन व वाहतूक केल्याचे स्पष्ट चित्र आहे. यामध्ये ठेकेदारांच्या नावावर यंत्रणेला हाताशी धरुन रेती माफियांनीच चुना लावला आहे. मात्र शासनाला प्राप्त अहवालात उत्खनन कमी झाल्याचे म्हटले आहे. महसूल विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला रेती प्रत्यक्ष केलेल्या उत्खननाचे तांत्रिक मोजमाप करण्याचे आदेश दिलेले आहेत. मात्र त्या आदेशाची अजूनही अंमलबजावणी झाली नाही. या सगळ्या बाबींतून अवैधरित्या केलेल्या रेती उत्खननाच्या भानगडींचे गौडबंगाल उघड होऊ नये म्हणून केवळ कागदोपत्री टोलवाटोलव करण्यात येत असल्याचे चित्र दिसून येत आहे. खडकपूर्णा नदीपात्रातून रेती उत्खननासाठी निविदेत निमगाव वायाळ घाट होता. तेथून रेती उपसा करुन जवळच्या डेपो मध्ये साठा करायचा व तेथून शासकीय दराने विक्री व वाहतूक करायची, असा साधा सोपा



व्यवहार होता. यावर तांत्रिक व मानवी निरीक्षणाचीही तरतूद होती. तर उत्खनन करण्याचे टप्पेही पाडले होते. यातून एकंदरीत १२ हजार ब्रास उत्खनन व्हावे, ही मर्यादा होती. मात्र जसा रेती घाट सुरु झाला. तसा राक्षसीपणाने रेती उपसा करण्यात आला. त्यासाठी महसूल व इतर यंत्रणांना चिरीमिरीच्या माध्यमातून हाताशी धरण्यात आले. तरीही शासनाला उत्खननाचा जो अहवाल देण्यात आला, त्यामध्ये फक्त ३ हजार ७०० ब्रास एवढाच आकडा देण्यात आला. त्यानंतर जानेवारी महिन्यात तत्कालीन तहसीलदार जैस्वाल यांनी रेती उत्खननाचे तांत्रिक मोजमाप करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व भूमि अभिलेख कार्यालयाला

**यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग देऊळगावराजा यांच्याशी संपर्क केला असता, ही तांत्रिक मोजणी भूमि अभिलेख कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग यांची संयुक्त आहे. परंतु, महसूल विभागाने पुढील पाठपुरावा केला नसल्याने ही मोजणी करण्यात आली नाही, असे सांगण्यात आले आहे.**

लेखी आदेश दिले. मात्र त्याची अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. याबाबतीत सूत्रांकडून माहिती घेतली असता, कागदोपत्री घोडे नाचवत उत्खनन मोजमापांच्या आदेश पूर्ण होणारच नाहीत याची आतून खबरदारी घेण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ह्या सर्व प्रकारांतून केलेला भ्रष्टाचार जनतेसमोर यावा. त्यासाठी उपविभागीय अधिकारी डॉ. संजय खडसे यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी खडकपूर्णा नदीकाठच्या ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. परंतु, रेती तस्करांच्या भीतीपायी जाहिरपणे ही मागणी व्यक्त करण्यासाठी पुढे येण्यास कुणीही धजावत नसल्याचेही चित्र आहे.

# अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांना पकडण्यासाठी महसूल विभाग सज्ज

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांना पकडण्यासाठी महसूल विभागाने सज्ज एसडीओ डॉ. संजय खडसे व तहसीलदार प्रवीण धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथके तयार सिंदखेडराजा अनिल दराडे त्यातील मंडळाधिकारी प्रेमानंद वानखेडे, तलाठी पंकज देशमुख व प्रदीप मोगल यांचे पथक काल दि. १० मे, शुक्रवारी रात्री पासूनच गस्त घालत होते. आज दि. ११ मे, शनिवारी सकाळी ६.०० वा. सुमारास एक अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर दरेगाव मार्गे जाणार असल्याची गुप्त खबर त्यांना मिळाली. त्यानुसार पथक मेरा बु. ते दरेगाव मार्गावर पोहचले. त्यावेळी ६.२० वा. एक टिप्पर मार्गावरुन शेंदूरजनकडे जात असल्याचे आढळले. त्याला अडवून पथकाने चौकशी केली असता रामेश्वर बंडू जिजोते, रा. देऊळगावमही, ता.




देऊळगावराजा याच्या मालकीचे असलेले विना नंबरचे टिप्पर वाहनचालक प्रविण शिवाजी डोईफोडे, रा. जागदरी, ता. सिंदखेडराजा हा घेऊन मार्गाने चालला होता. पाहणी केली असता, त्यात चार ब्रास रेती आढळून आली. रेती वाहतूकीसाठी आवश्यक असलेली कोणतेही कागदपत्रे नसल्याने पथकाने पंचनामा करुन टिप्पर जप्त केला व पुढील कारवाईसाठी साखरखेर्डा पोलिसांच्या ताब्यात दिला आहे.

# इसरुळ परीसरात विजांच्या कडकडाटासह पाऊस अंगावर वीजपडून बैल ठार...



**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील इसरुळ परिसरात शुक्रवार १० मे रोजी दुपारी ४ ते ५ वाजेदरम्यान अचानक विजांच्या कडकडाटासह आलेल्या वादळी पावसाने शेतकऱ्यांची पार दैना उडाली. बाजरी, ज्वारी, मका या शेतामध्ये खुडून ठेवलेल्या पिकांना झाकण्यासाठी एकच तारांबळ उडाली. तसेच काढणीला आलेल्या उडीद, कांदा या पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. तर इसरुळ येथील शेतकरी श्रीकिसन फक्कडगीर गिरी या शेतकऱ्यांनी अंदाजे १ लाख रूपये किंमतीची बैलजोडी उन्हामुळे सावलीसाठी झाडाखाली बांधून ठेवलेल्या बैलांच्या अंगावर वीज पडल्यामुळे एक बैल ठार झाला आहे तर दुसरा बैल काही वेळ बेशुद्ध अवस्थेत होता.

या घटनेची माहिती इसरुळ चे सरपंच तथा चिखली तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष सतीश पाटील भुतेकर यांनी तहसीलदार संतोष काकडे यांना दिली. तहसीलदार काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी गोविंदराव चव्हाण यांनी घटनेचा पंचासमक्ष पंचनामा केला. चिखलीचे पशुवैद्यकीय अधिकारी पडोळ साहेब व शेळगाव अटोळ चे डुकरे यांनी मृत बैलाची पाहणी करून शवविच्छेदन करून अहवाल तयार केला. यावेळी आपदग्रस्त शेतकरी व पंच मंडळी हजर होती शासनाकडून आपदग्रस्त शेतकऱ्यास मदतीची अपेक्षा लागून आहे

# बारा वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग

## २१ वर्षीय युवक करत होता पाठलाग शेवटी बोराखेडी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल.

**जनसंचलन/ मोताळा**

तालुक्यातील एका गावातील बारा वर्षीय मुलगी किराणा दुकानात सामान आणण्यासाठी जात असताना २१ वर्षीय युवकाने विनयभंग केल्याची तक्रार बोरखेडी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाली सविस्तर वृत्त अशे की तालुक्यातील एका गावातील एका ३२ वर्षीय व्यक्तीने बोराखेडी पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून,९ मे रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास १२ वर्षीय मुलगी किराणा दुकानावर सामान आणण्यासाठी गेली होती, गावातीलच श्रीकृष्ण रवींद्र सोनोने या २१ वर्षीय युवकाने मुलीचा पाठलाग करीत तिला एका पडक्या घरात घेऊन गेला आणि त्याठिकाणी वाईट उद्देशाने मिठी मारून विनयभंग केला. यावेळी



मुलीने आरडाओरडा केला असता, याबद्दल कोणाला काही सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली,असे बोराखेडी पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीमध्ये म्हटलेले आहे याप्रकरणी पोलिसांनी श्रीकृष्ण सोनोने या युवकाविरुद्ध पॉस्कोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ऑटोडील दुकानाला आग लावून ८ दुचाकी जाळल्या...

**जनसंचलन/ खामगाव**



स्थानिक शर्मा टर्निंगजवळ असलेल्या एका ऑटोडील दुकानाला अज्ञाताने पेट्रोल टाकून आग लावली. यामुळे सदर दुकानात ठेवलेल्या ८ दुचाक्या जळून खाक झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. येथील बसस्थानक जवळ असलेल्या शर्मा टर्निंग नजीक नसरुल्ला खान कुदरत उल्ला खान (३६) रा. ताज नगर यांचे टू व्हीलर गाड्यांचे ऑटोडील दुकान आहे. सदर दुकानांमध्ये जुन्या दुचाकी विक्रीसाठी ठेवण्यात येत असतात. दरम्यान गुरुवारी रात्री अज्ञात इसमाने पेट्रोल टाकून सदर दुकानाला आग लावली. यामुळे या दुकानातील ८ दुचाक्या व इतर साहित्य जळून खाक झाले आहे. यामुळे नसरुल्ला खान यांचे जवळपास साडेतीन लाखांचे नुकसान झाले आहे.या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून याप्रकरणी नसरुल्ला खान कुदरत उल्ला खान यांनी शहर पोस्टेला तक्रार दिली. वृत्तलिहेपर्यंत पोलीस कारवाई सुरू होती.

# शेगाव नगर पालिकेच्या कचरा डेपोला आग

**जनसंचलन/ शेगाव**



येथील नगर पालिकेच्या कचरा डेपोला (डम्पिंग ग्राउंड) आग लागल्याची घटना १० मे रोजी दुपारी ४ वाजता उघडकीस आली. शहरातील सर्व प्रकारचा घनकचरा संकलन करून गौलखेड रस्त्यावर असलेल्या नगर पालिकेच्या घनकचरा संकलन डेपोत टाकण्यात येतो. याठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे केंद्र देखील पालिकेने सुरू केलेले आहे. परंतु उन्हाचा पारा वाढल्याने दुपारी अचानक कचऱ्याने पेट घेतला व संपूर्ण परिसरात आग पसरली. त्यामुळे धुराचे लोटच्या लोट आसपासच्या परिसरात पसरले होते. आगीचे स्वरूप वाढत असल्याने नगर पालिका प्रशासनाने अग्निशमन दलाच्या दोन गाड्या दुपार पासून आग विझविण्यासाठी प्रयत्न करीत होत्या तर रात्री ११.३० वाजेपर्यंत आग विझली नव्हती. त्यामुळे खामगाव येथील अग्निशमन दल गाडी बोलण्यात आली होती. तर पाणीपुरवठा करणारे टँकर देखील आग विझविण्यासाठी लावण्यात आले होते. परंतु याठिकाणी प्रक्रिया करण्यासाठी असलेला कचरा संपूर्ण जळून नुकसान झाले होते.

# महसूल विभागाने जप्त केलेली रेती घरकूल लाभार्थ्यांना वाटप



**जनसंचलन/दुसरबीड**

तालुक्यातील दुसरबीड येथे आढळलेला अवैध रेतीसाठा महसूल व पोलीस विभागाने तो जप्त करीत, घरकुल लाभार्थ्यांना वाटप केला आहे. १० मे रोजी एसडीओ डॉ. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार प्रवीण धानोरकर, बीडीओ श्रीकृष्ण वेणीकर, तलाठी राहुल देशमुख, पोलीस शिपाई सलीम परसुवाले, अस्लम नवरागबादी यांनी त्याठिकाणी धाड टाकली. तेथे आढळलेल्या २० ब्रास रेती साठ्याचा पंचनामा करुन जप्त केला. त्यानंतर ह्या साठ्याचे करायचे काय ? असा प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळी दुसरबीड येथे घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी रेती मिळत नसल्याचे आढळून आले. त्यांना रेती वाटप करण्यासाठी एसडीओ डॉ. खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली घरकुल लाभार्थी असलेल्या गबाजी त्र्यंबकराव पवार, गजानन बाबुराव जगताप, संजय साहेबराव मोतेकर, शंकर अजबराव ढवळे, बाबुराव नामदेव जगदाळे, विठ्ठल आसाराम इंगळे, उत्तम रोडूबा शिंदे, बाबासाहेब भगवान भोसले, लीलाबाई तुकाराम जाधव, निर्मलाबाई किसन तिपाले या दहा व्यक्तींना प्रत्येकी २ ब्रास रेतीसाठा वाटप करण्यात आला. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. एसडीओंनी अशाच समाजोपयोगी कल्पनांचा अवलंब करावा, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

# भरोसा येथे एक आठवड्यात तीन चोऱ्या

## चोराचे हिमत वाढली गावकरी हवालदिल सुरक्षितेची अपेक्षा वाढली

**जनसंचलन/चिखली**

चिखली तालुक्यातील मौजे भरोसा येथे दोन दिवसापूर्वी भरोसा येथील भागवत नरहरी थुटे यांच्या घरामध्ये चोरांनी चांगलाच हात साप केला होता त्याला दोन दिवस होते नाही तोच आता भरोसा येथील बकऱ्या व कोंबड्या चोराने चोरून नेल्या आहेत भरोसा येथील शेख अजीज शेख युनुसभाई यांच्या भाग १ गट नंबर१८९मधुन त्यांच्या मालकीच्या गावरान पोल्ट्री फार्म मधून ७२ कोंबड्या चोरट्याने पळून नेले आहे तर पूजा ज्ञानेश्वर जाधव यांच्या शेतामधून गट नंबर ११ वसतनगर येथुन दहा बोकडे व बकऱ्या चोराने रात्रीच्या वेळेला चोरून नेले आहेत त्यामुळे भरोसा भागामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे चोराचे मनोधर्य चांगलेच या भागामध्ये वाढले आहे आठ दिवसात तीन चोऱ्या होणे ही खूप चिंतेचा विषय आहे या बाबीकडे अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी लक्ष देण्याची गरज



आहे शेतीला जोड व्यवसाय म्हणून ग्रामीण भागातील शेतकरी हे जोडधंद्याकडे वळले आहे परंतु चोराच्या भीतीमुळे शेतकऱ्यांनी जोडधंदे करावे की नाही हा मोठा विषय समोर येत आहे

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**जनसंचलन/बुलढाणा**

केळवदहून बुलडाणाकडे जाणाऱ्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीचालकाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार १० मे च्या रात्री घडली. प्राप्त माहितीनुसार बुलढाणा ते चिखली मार्गावरील केळवद येथील पवन गजानन खिल्लारे वय १७ वर्ष हा शुक्रवारी रात्री काही कामानिमित्त आपल्या दुचाकीने बुलडाणाकडे जात असताना अंत्री तेली फाट्याजवळ अज्ञात वाहनाने पवनच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यात तो बेशुद्ध झाला. काही लोकांनी तात्काळ मदत करत पवनला बुलडाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. शनिवार ११ मे ला सकाळी जिल्हा




सामान्य रुग्णालयात शवविच्छेदन करून पवनचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# छत्रपती संभाजी महाराज यांची जंयती मोठ्या उत्साहात होणार साजरी-आ.गायकवाड

जनसंचलन/बुलढाणा

छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य संकल्पनेचा वारसा पुढे चालविणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांचा जयंती सोहळा हा सर्वात मोठा महाराष्ट्रात साजरा होतो तो, बुलढाणा शहरात. तीच ४० वर्षांची परंपरा यावर्षी भव्य-दिव्य स्वरुपात आयोजीत केल्या गेली असून, आंध्र व दिल्ली येथून अध्यात्मीक देखावे सादर करणारे लक्षवेधी पथके यासह मल्लखांब अन् खूप असे चित्तथरारक प्रात्यक्षिके मंगळवार १४ मे रोजी सायंकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत निघणाऱ्या शोभायात्रेत सादर केली जातील.. अशी माहिती सोहळ्याचे संस्थापक संकल्पक धर्मवीर आ. संजय गायकवाड यांनी दिली. बुलढाणा येथील मातोश्री जनसंपर्क कार्यालयात आज शनिवार ११ मे रोजी त्यांनी जयंती सोहळ्याची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी अध्यक्ष बाळासाहेब थुड, कार्याध्यक्ष प्रा. अनिल रिंढे व सचिव आशिष जाधव उपस्थित होते. छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त शहरातील विविध परिसरात १३ मे रोजी बाईक रॅली काढली जाईल. सदर रॅलीचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य युवा सेना कार्यकारणीचे सदस्य तथा युवा सेना जिल्हाप्रमुख मृत्युंजय गायकवाड यांच्याहस्ते सकाळी ९ वाजता दरम्यान



जयस्तंभ चौक येथे केले जाणार आहे. तर सायंकाळी ५ वाजता शहरातील आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बुलढाणा अर्बन परिवारचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक, मंत्री गुलाबराव पाटील, खा. प्रतापराव जाधव, आ. राजेंद्र शिंगणे उपस्थित राहणार आ-हेत. प्रमुख पाहुणे म्हणून आ. संजय रायमुलकर, आ. डॉ.संजय कुटे. आ. आकाश फुंडकर, आ. श्वेताताई महाले, आ. धीरज लिंगाडे, आ. राजेश ऐकडे, जिल्हाधिकारी किरण पाटील, पो-लीस अधीक्षक सुनील कडासने, जिल्हा शल्य चिकित्सक सुभाष चव्हाण आदी मंडळींना आमंत्रित करण्यात आले आहे. याशिवाय विविध क्षेत्रातील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. बुलढाणा शहरातील छत्रपती संभाजी राजे जयंती सोहळ्याला महाराष्ट्रभर एक वेगळे महत्व असते. आ. संजय गायकवाड यांच्या संकल्पनेतून वप्रेरणेतून हा सोहळा सुरु झाला असल्याचे यावेळी अध्यक्ष बाळासाहेब धुड यांनी सांगितले. सदर उत्सव समिती जास्तीत जास्त संख्येने नागरिक उपस्थित रहावे, असे आवाहन धर्मवीर संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब धूड, आशिष जाधव, गजेंद्र दांदळे, मोहन पराड, संदीप गायकवाड, जीवन देवानंद दांडगे, मुना बेडवाल, विशाल शेळके, श्रीकांत गायकवाड, दीपक तुपकर, ज्ञानेश्वर खांडवे, अनिल रिंढे आदींनी केले आहे. १४ मे रोजी सकाळी ८. ३० वाजता शहरातील जयस्तंभ चौक या ठिकाणी जन्म सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पूजाताई गायकवाड.. कोमलताई अंजली परांजपे, गायत्री सावजी, सविता भालेकर, रोहिणी बाहेकर, अपर्णा चव्हाण, आरती वानरे, मीनाताई गायकवाड, स्वाती जाधव, योगिता गायकवाड, मनीषा बावस्कर, श्रेया गायकवाड आदी महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून पाळणा गायला जाणार आहे.

# निलंबित कर्मचाऱ्याने केली तक्रार न.प.च्या मुख्याधिकाऱ्यांसह दोघेजण जाळ्यात



वृत्तसंस्था/ परतूर

फक्त लाचच न मागता लाचेसोबत एका विदेशी कंपनीची दारू मागितली आणि ती देखील निलंबित झालेल्या आपल्याच कार्यालयातील कर्मचाऱ्याला .परंतु या कर्मचाऱ्यांची लाच देण्याची इच्छा नव्हती. .त्यामुळे त्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार नोंदवली आणि या तक्रारीच्या अनुषंगाने रचलेल्या सापळ्यामध्ये पालिकेचे मुख्याधिकारी आणि एक चतुर्थ श्रेणी कर्मचारी अडकले आहेत. या प्रकरणातील तक्रारदार हा पूर्वी परतुर नगरपालिकेमध्येच कर्मचारी होता. त्याची बदली बल्लाळपूर येथे झाले आहे. तिथे हजर झाल्यानंतर २०२३ मधील निलंबन कालावधी मधील पगार बिल काढून देण्यासाठी आणि परतूर नगरपालिकेतून बल्लाळपूर येथे सेवा पुस्तक पाठविण्यासाठी या नगरपालिकेचे प्रभारी स्थानक पर्यवेक्षक तथा फायरमन अनिल वल्लभदास पारिख, वय ४८ वर्ष (वर्ग चार) याने ७५ हजार रुपये तसेच सिग्नेचर कंपनीची विदेशी दारू लाच म्हणून मागितली. दिनांक आठ आणि नऊ असे दोन दिवस या व्यवहारांमध्ये तडजोड सुरू होती. शेवटी नऊ तारखेला चाळीस हजार आणि विदेशी दारूची बाटली यावर हा व्यवहार पक्का झाला. परंतु तक्रारदाराचे पगार पत्रक बल्लाळपूर येथे पाठविण्यासाठी या पालिकेचे मुख्याधिकारी अभिषेक अशोक परदेशी, वय ३८ वर्ष (वर्ग दोन )यांनी १५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी अनिल पारीख यांनी केली .अशी एकूण ५५ हजार रुपये रोख आणि सिग्नेचर कंपनीची विदेशी दारूची बाटली लाच म्हणून स्वीकारताना जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज दिनांक १० रोजी अनिल पारिक याला रंगेहात पकडले आहे. लाच घेण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचा आरोप मुख्याधिकारी अभिषेक परदेशी यांच्यावर ठेवण्यात आला असून दोघांवरही गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

# विटभट्टीवरील विवाहिता झाली बेपत्ता...




जनसंचलन/ खामगाव

तालुक्यातील विहिगाव शिवारात एका वीटभट्टीवर कामाला अस-लेली २० वर्षीय विवाहिता बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. बाळापुर तालुक्यातील कोळसा येथील विकास नारायण वानखडे (२७) व त्याची पत्नी सौ. अंजली विकास वानखडे (२०) हे दोघे मजुरीने तालुक्यातील विहिगाव येथील एका विटभट्टीवर आहे. कामाला आहेत. दरम्यान ९ मे रोजी सौ. अंजली वानखडे ही शौचास जाते असे सांगून घरून निघून गेली, मात्र परत आलीच नाही. यामुळे तिच्या पतीने नातेवाईकांनी व सर्वत्र शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही. यामुळे याबाबत तिचा पती विकास वानखडे याने खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशनला तक्रार दिली असून पोलिसांनी हरविल्याची नोंद केली

# तुरुंगातून बाहेर येताच केजरीवाल अजितदादांवर का तुटून पडले?...

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कोर्टाने जामीन मंजूर केल्याने आता ते तुरुंगातून बाहेर आले आ-हेत. त्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून ते निवडणूक प्रचाराच्या कामाला लागले. त्याआधी त्यांनी एक पत्रकार परिषद घेतली. ज्यामध्ये त्यांनी मोदी-शा-हा यांच्यावर तुफान हल्ला चढवला. एवढंच नव्हे तर अजित पवारांवर देखील त्यांनी निशाणा साधला. ज्या लोकांबाबत मोदीजी म्हणत होते की, त्यांनी ७० हजार कोटींचा यांनी घोटाळा केला. थोड्याच दिवसात त्याच माणसाला आपल्यासोबत घेऊन कोणाला उपमुख्यमंत्री बनवलं.. असं म्हणत केजरीवाल यांनी अजित पवारांचं नाव न घेता त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. याशिवाय अरविंद केंजरीवाल यांनी असाही आरोप केला की, देशातील सगळे चोर आणि दरोडेखोर यांना भाजप आपल्या पक्षात घेत आहे. अशाप्रकारचे अनेक गंभीर आर-ोप केजरीवाल यांनी केले आहेत. पंतप्रधान म्हणतायेत की, ते भ्रष्टाचाराशी लढतायेत.. देशातील सर्वात मोठ्या चोर-दरोडेखोरांना त्यांनी त्यांच्या पक्षात घेतलं. ज्या लोकांबाबत मोदीजी म्हणत होते की, त्यांनी ७० हजार कोटींचा यांनी घोटाळा केला. थोड्याच दिवस-ात त्याच माणसाला आपल्यासोबत घेऊन कोणाला उपमुख्यमंत्री बनव-तात तर कोणाला मंत्री बनवतात.. आणि त्यांचे सगळे ईडी-सीबीआयचे केसेस संपवून टाकतात.. आणि म्हण-तात की मी भ्रष्टाचाराशी लढतोय.. मी मोदींना सांगू इच्छितो की, भ्रष्टाचाराशी लढाई कशी लढायची हे शिकायचं असेल तर केजरीवालकडून शिका.. भ्रष्टाचाराविरोधात लढाई केजरीवालने लढली आहे.२०१५ मध्ये आमचं जेव्हा सरकार बनलं होतं.. तेव्हा आमच्या एका मंत्र्याचा एक ऑडिओ माझ्याकडे आला होता. त्या ऑडिओमध्ये मंत्री एका दुकानवाल्याकडून ५ लाख रुपये मागत



होता. कोणत्याही मीडियावाल्यांना किंवा विरोधी पक्षाला काही माहिती नव्हतं. मी माझ्या मंत्र्याला स्वत: सीबीआयच्या हवाली केलं. जेल पाठवलं होतं. ही असते भ्रष्टाचाराविरोधातील लढाई. पंजाबमध्ये एक मंत्री पैसे मागत असल्याचं समजलं तेव्हा मान साहेबांनी आणि आम्ही आमच्या मंत्र्याला उचलून तुरुंगात पाठवलं.. तुम्ही तुमच्या पक्षात देशातले सगळे चोर-डाकू यांना घ्या आणि केजरीवालला तुरुंगात पाठवा.. तर पंतप्रधान तुम्ही भ्रष्टाचाराविरोधात अजिबात लढत नाही. तुम्ही देशवासियांना मूर्ख समजू नका. असं म्हणत केजरीवाल यांनी पंतप्रधान मोदी आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला.